# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/11/2021 (सोमवार)

---

## घरफोडी

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील रेवतकर लेआउट उमरेड येथे दिनांक 13/11/2021 चे 23.00 वा. ते दिनांक 14/11/2021 चे 09.00 वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ माधुरी अकुंश झाडे, वय 32 वर्ष, रा. रेवतकर ले आउट उमरेड या आपले परिवारासह दि. 11/11/2021 रोजी भाउबिज सणा निमीत्य गावी गोंदीया येथे गेल्या होत्या व घराची चाबी त्यांचे आई ला दिली होती. दि. 14/11/2021 रोजी सकाळी 09.00 वा. दरम्यान त्या भावाचे घरी असतांना आईने फोन व्दारे माहिति दिली की, अज्ञात आरोपीने घराचे दाराचे कोंडा तोडुन घरात प्रवेश करून लोखंडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने किंमती अदांजे 89,000/—रू. चा माल व जुनी वापरती एलईडी टिव्ही कि. 7,000/—रू. व होम थेअटर अदांजे कि. 4,000 /—रू. व नगदी 1,000/—रू. असा एकुण कि. 10,1000/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले. तसेच शेजारी राहणारे मोरेश्वर तुळशीराम हाडके, वैभव विजय बाविसकर यांचे घरी अज्ञात आरोपीने घरफोडी करण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380, 511 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री बटटुलाल पांडे मो. क्र. 9763707984 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत 07 कि.मी. अंतरावरील ईसापुर येथे फिर्यादी नामे— सुनिल मारोतराव पोटभरे वय 53 वर्ष, रा. वार्ड नं 1 महादुला कोराडी गायत्री किराणा जवळ यांचे ईसापुर शिवारात शेत असुन त्यात शेती करीता लागणारे 1. कल्टीवेटर लोखंडी जुना किंमती 10,000/—रू., 2. प्लाउ (नागर) लोखंडी किंमती 15,000/—रू., 3. लोखंडी पावडा (लेवल करणारा) किंमती 10,000/—रू. असा एकुण किंमती 35,000/—रू. चा मुद्देमाल असे ठेवुन दि 13/11/2021 चे सांयाकाळी 18.00 वा. चे दरम्यान घरी निघुन गेले. दिनांक 13/11/2021 चे 18.00 वा. ते दिनांक 14/11/2021 चे 10.00 वा. सुमारास अज्ञात आरोपीने वरील वर्णनाचे शेती उपयोगी वस्तु उघडया जागेवरून चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नामदेव धांडे मो न 9764401246 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. भिवापुर :— अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील शासकिय आय टि आय जवळ भिवापुर येथे दिनांक 14/11/2021 चे 09:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे— शेषराव श्रीपात शेंदरे, वय 47 वर्ष, रा. तास व गावातील रामु वाघ व ट्रॅक्टर ड्रायव्हर नामे— बंडु उर्फ देवराव श्रीरामे (मृतक) व फिर्यादीचा परीवार हे आपल्या शेतातलील धानाचे पोते आणणे करीता गेले होते. शेतातले पोते घरी आणुन ठेवल्यानंतर बंडु हा फिर्यादी म्हणाला की, 'आंग पाय खुप दुखत आहे कुठे दारू भेटते का बघु' त्यावरून फियादी व बंडु दोघेही तास तेथुन भिवापुर रस्त्यांनी पायदळ दोघेही आय टी आय जवळ आले असता 09.30 च्या सुमारास मागेहुन एक एमएच— 40/बीवाय— 6362 क्रमांकाचा मोटारसायकलचा चालक आरोपी हा भरधाव वेगात येवुन बंडु याला जबर धडक दिली. या अपघातात तो खाली पडला त्यामुळे त्याच्या डोक्याला मार

लागला तसेच मोटारसायकल चालक व मागे बसलेला इसम सुद्धा खाली पडुन त्यांना सुद्धा मार लागला. बंडु श्रीरामे याला उपचाराकामी ग्रामीण रूग्णालय भिवापुर येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री सपोनि शरद भस्मे मो.क्र. 9764946808 हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

1) पो. स्टे. रामटेक :– अंतर्गत 16 कि.मी. अंतरावर मौजा नगरधन येथे दिनांक 13/11/2021 चे 08.00 ते 09.00 वा. सुमारास अल्पवहीन मुलगा शौर्य सागर माहुले(मृतक) वय 2 वर्षे रा. नगरधन हा अंगनात खेळत असतांना समोरील गाव तलाव येथे पाण्यात गेला असता पाण्यात बुडुन तो मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सागर शंकर माहुले, वय 30 वर्षे, रा. इंदिरा नगर टोली नगरधन यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार राजेन्द्र अडामे पोस्टे रामटेक मो. क्र. 9637400873 हे करीत आहे.

2) पो. स्टे. जलालखेडा :– अंतर्गत 14 कि.मी. अंतरावरील मौजा नायगाव शेत शिवार येथे संजय भाउराव साखरे (मृतक), वय 60 वर्षे, रा. परांडसिंगा ता. नरखेड हे दि.13.11.21 चे 10.00वा. शेतात गेले होते व रात्री चे 00.00 वाजे पावतो घरी परत न आल्याने त्यांच्या मुलाने दि. 14.11.21 वेळ 01.41 वा. पो.स्टे. ला मिंसीग क्र. 26/21 रिपोर्ट दिल्यावरून सदर मृतकाच्या त्याच्या शेतातील आजुबाजूच्या मदतीने विहीरीत शोध घेतला असता त्यांचे प्रेत दि. 14.11. 21 ला विहीरीत मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रोशन संजयराव साखरे वय 24 वर्ष रा. परांडसिंगा ता.काटोल यांच्या रिपोर्टवरुन पो. स्टे. जलालखेडा येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास स.फौ. अनिल जोशी मो.नं. 7499760728 हे करीत आहे.

3) पो. स्टे. उमरेड :– अंतर्गत 10 कि.मी. अंतरावरील मौजा कवडसी बरड शिवार येथे दि. 14.11.21 चे 16.00 वा. फिर्यादी नामे– राजेश दादाजी सावसाकडे, वय 59 वर्ष रा. चारगांव घोडाळी हे आपल्या शेतात हजर असता त्यांच्या शेतातील शेत तलावाच्या बोडीत अचानक आवाज आला तो आवाज पाण्याचा असल्याने फिर्यादी शेतातील पाण्याच्या गंडयाजवळ गेले असता विनोद दत्तुजी डडमल (मृतक), वय 35 वर्ष रा. चारगांव घोटाळी ता. भिवापुर जि. नागपुर हा त्या गंडयातील पाण्यात पडलेला दिसला. शेतील आजुबाजुच्या लोकांना बोलाविले व लोकांनी त्यास बाहेर काढले व त्यास जमिनीवर लेटवुन छातीला व पायाला दाबले असता तो कोणतीही हालचाल करित नसल्यामुळे त्यास ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन त्यास मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मनोज वाघ मो. क्र. 9420756751 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर